**CNR No.MHSI010006882017**

## नियमित दिवाणी अपील क्र. १२०/२०१७ मधील निशाणी ४४ खालील आदेश

**(स्नेहलता भागवत – अपिलार्थी वि. चंद्रकांत ठाकर व. – उत्तरार्थी)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार (अपिलार्थी क्र. १ब) यांनी अपिलार्थी– स्नेहलता सुधाकर भागवत यांचा मृत्यू दि. २८/११/२०२४ रोजी झाल्यामुळे, त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ५२ दिवसांचा विलंब क्षमापित होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. उत्तरार्थी यांनी त्यांच्या म्हणण्याव्दारे प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

३. युक्तीवाद ऐकला.

४. माझी निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

५. अभिलेखावरील कागदपत्रांची यादी निशाणी ४८ सोबत दाखल केलेल्या अपिलार्थी– स्नेहलता सुधाकर भागवत यांच्या मृत्यू प्रमाणपत्रावरून त्यांचा मृत्यू दि. २८/११/२०२४ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर आणण्याचा अर्ज हा दि. २८/०२/२०२५ चे अगोदर दाखल करणे आवश्यक होते. तसे मुदतीत झालेले नाही. प्रस्तुतच्या अर्जास साधारणपणे ५२ दिवसांचा विलंब झाल्याचे अर्जात नमूद असले तरी प्रत्यक्षात सुमारे ११० दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले विलंबाचे कारण जसे की, ते वकिलांशी वेळीच संपर्क साधू शकले नाही, हे संयुक्तिक नाही. अशापरिस्थितीत विलंबाचे कारण, विलंबाचा कालावधी आणि उत्तरार्थी यांनी प्रस्तुत अर्जास नोंदविलेला आक्षेप यांचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्च रक्कम बसवून मंजूर करणे उचित राहील. सबब आदेश.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ४४ मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी खर्च रक्कम ₹१००/– भरणा करण्याच्या अटीवर सदरचा विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदरची खर्च रक्कम ₹१००/– ही सावंतवाडी तालुका बार असोसिएशन यांच्याकडे पुस्तक खरेदीसाठी जमा करावी व रक्कम भरल्याची पावती दाखल करावी.

सही/–

दिनांकः–२८/०४/२०२६

(डॉ सुधीर म देशपांडे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस

SUDHIIR MAHADEO DESHPANDE

Digitally signed by SUDHIIR MAHADEO DESHPANDE
Date: 2026.04.28 15:10:00 +0530

All concerned to act upon digitally signed uploaded copy of this order, the printout of which can be verified from the official website of this court. In this regard attention of all concerned is invited to the authority of the Hon'ble High Court of Bombay (Bench at Aurangabad) ***Shital Krushna Dhake v. Krushna Dhake***, MANU/MH0285/2018.